प्रेसनोट दिनांक १५/०३/२०१९

## समर्थ पोलीस ठाणे पुणे

### मिसींग आई व तिचे लहान मुलास ७ दिवसात शोधून काढले.

गंजपेठेत रहाणारी मुस्लीम तरुण विवाहित स्त्री ही तिचे अडीच वर्षाचे मुलासमवेत रहाते घरातून दि.९/३/२०१९ रोजी समाधान चौक , नानापेठ पुणे येथे गेलेली होती ती परत घरी आली नाही . यामुळे तिचा पतीने ती समाधान चौक , नानापेठ पुणे येथून हरविलेली असल्याबाबत समर्थ पोलीस ठाण्यात त्याने तक्रार दाखल केलेली होती. तक्रार तपासाकरीता सहायक पोलीस निरीखक परवेज शिकलगार यांचेकडे देण्यात आलेली होती. त्यांनी हरविलेली स्त्री हिचे हरविणेच्या अनुषंगाने विविध पैलूंचा विचार करुन तपास आरंभ केला. त्यांचा विवाह होऊन केवळ तीन वर्ष् झालेली होती. तथापी हरविलेली स्त्री व तिचा पती यांचेमध्ये संशयावरुन वेळोवेळी भांडणे होत होती.अशी माहिती तिचे माहेराचे लोकांकडून मिळाली. तेव्हा तिचे विवाहापूर्वी एका व्यक्तीशी प्रेमसंबध असल्याची माहिती समजली. त्या इसमाचा शोध घेतला असता तो मिळून आला व त्याने हरविलेली महिला ही तिचे लहान मुलासमवेत आलेली आहे. तेव्हा हरविलेली मुस्लीम स्त्री व तिचा लहान मुलगा यांना दि.१४/३/२०१९ रोजी तिचे प्रियकरा सोबत ताब्यात घेण्यात आले.

ताब्यात घेतल्यानंतर विवाहित स्त्री हिने आपले पतीचे घरी जाणेस स्पश्ट नकार दिला व तिचे मुलाचा त्याग करुन ती तिचे प्रियकरासोबत उर्वरित आयुष्य व्यतित करणार असल्याचे तिने सांगितले. तेव्हा महिला दक्षता समिती सदस्या व महिला पोलीस यांचेकरवी देखील तिचे समुपदेशन करण्याचा प्रयत्न करण्यात आला गत आयुष्यातील घडलेल्या घटना विसरुन जाऊन सदर विवाहित महिला ही आपले सासरी रहाणेस आणि आपले लहान मुलाचा योग्य साभांळ करणेस तयार होऊन आपले पती समवेत गेली. तिचे प्रियकराचे देखील समुपदेशन करण्यात येऊन त्यास सदर महिलेचे संसारी आयुष्यात ढवळाढवळ न करणेची समज देण्यात आली आहे